# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 13 SEP 2025
टिपणी क्रमांक व्हीरी 4001
जावक दिनांक 13 SEP 2025

## सोमवार, दि. २६ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये झालेले निर्णय.

| विषय | निर्णय |
|---|---|
| ०१ प्रव-अ-५४/२६०४२५<br>मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. १०.०३.२०२५ व दि. १६.०३.२०२५ रोजीच्या सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | म : ५९/२६०४२५<br>मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. १०.०३.२०२५ व दि. १६.०३.२०२५ रोजीच्या सभांचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येत आहे.<br>सदर इतिवृत्तातील सर्व विषय आणि ठराव संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ०२ प्रव-अ-५५/२६०४२५<br>मा.व्यवस्थापन परिषदेच्या दि. २३.०१.२०२५ व दि. ०३.०२.२०२५ रोजीच्या सभेमधील निर्णयांवरील कार्यवाहीबाबत. | म : ६०/२६०४२५<br>व्यवस्थापन परिषदेच्या दि. २३.०१.२०२५ व दि. ०३.०२.२०२५ रोजीच्या सभेमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयांवर विद्यापीठ कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे. |
| ०३ प्रव-अ-५६/२६०४२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मा. अधिसभेच्या दि. ३०.११.२०२४ रोजी झालेल्या सभेमध्ये डॉ. हर्ष काशिनाथराव गायकवाड यांनी मांडलेला प्रस्ताव/ठराव मा. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ व निर्णयार्थ प्रस्ताव सादर. | म : ६१/२६०४२५<br>यापूर्वीच्या व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार सन २०२४ मधिल व्यवस्थापन परिषदेच्या सभांमध्ये घेण्यात आलेले विद्यार्थी हिताचे निर्णय संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले असून दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ पासून व्यवस्थापन परिषदेच्या सर्व सभांचे इतिवृत्त कायम करण्यात आल्यानंतर संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहेत. मा. व्यवस्थापन परिषदेच्या सभांची इतिवृत्ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागणी केल्यास उपलब्ध करून देण्यात येत आहेत. सबब, अत्यल्प मनुष्यबळ विचारात घेता अधिकार मंडळांच्या सदस्यांना त्यांच्या मागणीनुसार मा. व्यवस्थापन परिषदेच्या सभांचे इतिवृत्त सभा व दप्तर विभागामध्ये पाहणीकरीता उपलब्ध करून देण्यात येईल. |
| ०४ प्रव-अ-५७/२६०४२५<br>मा. अधिसभा अप्र (४०)/३०११२४ प्रस्ताव क्र. २, दि. ३० नोव्हेंबर, २०२४ व १ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या अधिसभेतील अमृत महोत्सवी वर्षामध्ये विद्यापीठाचे पहिले कुलगुरू बॅरिस्टर मु. रा. जयकर यांच्या साहित्याचे स्वतंत्र दालन ग्रंथालयात सुरू करण्यासंबंधी सुचनेच्या शिफारसीचा ठराव मा. व्यवस्थापन परिषदेसमोर मान्यतेसाठी सादर. | म : ६२/२६०४२५<br>अमृत महोत्सवी वर्षामध्ये जयकर ज्ञानस्त्रोत केंद्र येथे विद्यापीठाचे पहिले कुलगुरू बॅरिस्टर मु. रा. जयकर यांच्या साहित्याचे स्वतंत्र दालन सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ०५ प्रव-अ-५८/२६०४२५<br>सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०० (५) (ग) नुसार बांधकाम समितीची सभा दि. २४.१०.२०२४ | म : ६३/२६०४२५<br>दि. २४.१०.२०२४ रोजी बांधकाम समितीच्या सभेमध्ये करण्यात आलेले खंड-१ मधील ठराव क्र. ब-१/२४-२५ ते ब- |

| | |
|---|---|
| रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बांधकाम समितीच्या सभेमध्ये करण्यात आलेले खंड-१ मधील ठराव क्र. ब-१/२४-२५ ते ब-११/२४-२५ इतिवृत्तासह प्रस्ताव मा. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सविनय सादर. | ११/२४-२५ मधील ठरावांना मान्यता देण्यात येत आहे. |
| ०६ प्रव-अ-५९/२६०४२५<br>शेठ हिराचंद नेमचंद जैन अध्यासनास प्राप्त झालेल्या अधिकच्या देणगीबाबत. | म : ६४/२६०४२५<br>शेठ हिराचंद नेमचंद जैन अध्यासनास प्रस्तावात नमूद केलेल्या देणगीदारांमार्फत प्राप्त झालेली अधिकची देणगी रक्कम रु. २६,१००/- स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ०७ प्रव-अ-६०/२६०४२५<br>शेठ हिराचंद नेमचंद जैन अध्यासनास प्राप्त झालेल्या अधिकच्या देणगीबाबत. | म : ६५/२६०४२५<br>शेठ हिराचंद नेमचंद जैन अध्यासनास देणगीदार श्री. स्नेहल चंद्रकांत कुटे यांचेकडून प्राप्त झालेली अधिकची देणगी रक्कम रु. ५,०००/- स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ०८ प्रव-अ-६१/२६०४२५<br>डॉ. देवाप्रसाद हनगल मेमोरियल स्कॉलरशीपकरिता प्राप्त झालेल्या अधिकच्या देणगीबाबत. | म : ६६/२६०४२५<br>डॉ. देवाप्रसाद हनगल मेमोरियल स्कॉलरशीपसाठी देणगीदार डॉ. डेविड हनगल यांच्याकडून प्राप्त झालेली अधिकची देणगी रक्कम रु. १,००,०००/- स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| ०९ प्रव-अ-६२/२६०४२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळास प्राप्त झालेल्या देणगीबाबत. | म : ६७/२६०४२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळास स्टार्टअप इकोसिस्टीम डेव्हलपकरीता मनुष्यबळाची नेमणूक करण्यासाठी देणगीदार श्री हितेश मुंधडा यांच्याकडून प्राप्त झालेली देणगी रक्कम रु. २,५०,०००/- स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| १० प्रव-अ-६३/२६०४२५<br>दि. ११/०१/२०२५ रोजी झालेल्या वित्त व लेखा समितीच्या शिफारशी विचारार्थ व मान्यतेसाठी सादर. | म : ६८/२६०४२५<br>दि. ११/०१/२०२५ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या सभेच्या मधील ठराव क्र. FAC/२४/२०२४-२५ ते ठराव क्र. FAC/२८/२०२४-२५ नुसार केलेल्या शिफारसींस मान्यता देण्यात येत आहे. |
| ११ प्रव-अ-६४/२६०४२५<br>स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये स्वयंनिर्वाही SPPU-UPSC/MPSC प्रशिक्षणाची नवीन तुकडी (पूर्व परीक्षा व मुख्य परीक्षा) सुरू करण्यासाठी मान्यता मिळणेबाबत. | म : ६९/२६०४२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, स्पर्धा परीक्षा केंद्रामध्ये स्वयंनिर्वाही **UPSC** व **MPSC** प्रशिक्षण प्रवर्ग शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>पुढे असाही ठराव करण्यात येतो की, **UPSC/MPSC** स्वयंनिर्वाही प्रशिक्षण प्रवर्ग खालील बाबींवर आधारीत राहील.<br>१) **UPSC** प्रशिक्षण वर्ग - एकूण जागा ४०<br>२) **MPSC** प्रशिक्षण वर्ग - एकूण जागा ४०<br>३) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाराष्ट्र सरकारच्या आरक्षण नियमाप्रमाणे प्रवेश दिला जाईल. (महिलांसाठी ३० टक्के जागा राखीव ठेवल्या जातील.)<br>४) खुल्या प्रवर्गासाठी प्रशिक्षण शुल्क रु. ३०,०००/- व राखीव प्रवर्गासाठी प्रशिक्षण शुल्क प्रत्येकी रु. ७,५००/-(११ महीने प्रशिक्षण कालावधीसाठी.)<br>५) अनामत रक्कम :- रु. २,०००/- (परतावा)<br>६) प्रवेश अर्ज व प्रवेश परीक्षा फी - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियमानुसार प्रत्येक वर्षी अर्थसंकल्प (जमा व खर्च) मा. कुलगुरू यांच्या मान्यतेने करावा. |

१२ प्रव-अ-६५/२६०४२५

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० अंमलबजावणीच्या अनुषंगाने मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत संरक्षण व सामरिकशास्त्र अभ्यासमंडळांतर्गत स्ट्रॅटेजिक कल्चर अॅड सेक्युरिटी फाउंडेशन, पुणे (Strategic Culture & Security Foundation, Pune) या संस्थेच्या गुणपत्रकांवर व प्रमाणपत्रांवर विद्यापीठाचे बोधचिन्ह (Logo) वापरण्याची परवानगी मिळण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून मान्यता देणेबाबत.

म : ७०/२६०४२५

मा. विद्या परिषदेने दि. २७ फेब्रुवारी, २०२५ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्रमांक वि.प.क्र. ब ०१पीए/०१/२०२५ नुसार केलेली शिफारस अमान्य करण्यात येत आहे.

१३ प्रव-अ-६६/२६०४२५

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेअंतर्गत M.Sc. (Molecular Medicine) ही पदव्युत्तर पदवी नव्याने प्रस्थापित करण्यास व त्याच्या अभ्यासक्रम आराखड्याबाबत.

म : ७१/२६०४२५

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेंतर्गत **M.Sc. (Molecular Medicine)** ही पदव्युत्तर पदवी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून नव्याने प्रस्थापित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१४ प्रव-अ-६७/२६०४२५

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ०१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांना सेवानिवृत्तिच्या वेळेस देण्यात येणाऱ्या सुवर्णमुद्रेबाबत.

म : ७२/२६०४२५

दिनांक ०१ एप्रिल २०२५ ते दिनांक ३१ मार्च २०२६ या कालावधीत सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना खालील तक्त्याप्रमाणे देण्यात येणाऱ्या ६१ सुर्वणमुद्रांच्या खरेदीसाठीच्या अंदाजे रु. ५९,७८,०००/- (जीएसटी सह) एवढ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर सुवर्णमुद्रा पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स प्रा. लि. यांच्याकडून खरेदी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | महिना | सेवानिवृत्त सेवकांची संख्या | | | अंदाजे रु. ९८,०००/- प्रति सुवर्णमुद्रा नुसार एकूण खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|
| | | शिक्षक | शिक्षकेतर | एकूण | |
| १. | एप्रिल २०२५ | ०१ | ०२ | ०३ | २,९४,०००.०० |
| २. | मे २०२५ | ०० | १० | १० | ९,८०,०००.०० |
| ३. | जून २०२५ | ०० | ०५ | ०५ | ४,९०,०००.०० |
| ४. | जुलै २०२५ | ०० | ०५ | ०५ | ४,९०,०००.०० |
| ५. | ऑगस्ट २०२५ | ०१ | ०१ | ०२ | १,९६,०००.०० |
| ६. | सप्टेंबर २०२५ | ०१ | ०५ | ०६ | ५,८८,०००.०० |
| ७. | ऑक्टोबर २०२५ | ०१ | ०१ | ०२ | १,९६,०००.०० |
| ८. | नोव्हेंबर २०२५ | ०३ | ०० | ०३ | २,९४,०००.०० |
| ९. | डिसेंबर २०२५ | ०१ | ०५ | ०६ | ५,८८,०००.०० |
| १०. | जानेवारी २०२६ | ०० | ०२ | ०२ | १,९६,०००.०० |
| ११. | फेब्रुवारी २०२६ | ०१ | ०५ | ०६ | ५,८८,०००.०० |
| १२. | मार्च २०२६ | ०० | ०४ | ०४ | ३,९२,०००.०० |
| १३. | स्वेच्छानिवृत्ती, कार्यमुक्त व सेवेत असताना निधन झालेले सेवक | | (अंदाजे) | ०७ | ६,८६,०००.०० |
| | एकूण | | | ६१ | ५९,७८,०००.०० |

१५ प्रव-अ-६८/२६०४२५

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून दि शेतकरी शिक्षण मंडळाचे भिवराबाई सावंत कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सावंत कॉर्नर, पुणे सातारा रोड कात्रज, पुणे - ४११ ०४१ (युनिपुणे आयडी.: CEGP015710) या संशोधन केंद्रातील विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा - पीएच.डी. (इ अॅण्ड टीसी) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून टप्प्याटप्प्याने बंद (Progressive Closure) करण्यासाठी आलेल्या अर्जावरील / प्रस्तावावर चौकशी समितीच्या अहवालाचा विचार करणे.

म : ७३/२६०४२५

दि शेतकरी शिक्षण मंडळाचे भिवराबाई सावंत कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सावंत कॉर्नर, पुणे सातारा रोड कात्रज, पुणे - ४११ ०४१ (युनिपुणे आयडी.: CEGP015710) या संस्थेस/महाविद्यालयास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा - पीएच.डी. (इ अॅण्ड टीसी) हा अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने बंद (**Progressive Closure**) करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १६ प्रव-अ-६९/२६०४२५<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून अंजूमन खैरूल इस्लामचे पूना कॉलेज, १६४७, कॅम्प, न्यु मोदिखाना, पुणे - ४११००१ (युनिपुणे आयडी.: CAAP010210) या संशोधन केंद्रातील मानवविज्ञान विद्याशाखा - एम. फिल. अर्थशास्त्र तसेच विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा - एम.फिल. केमिस्ट्री हे अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून टप्प्याटप्प्याने बंद (Progressive Closure) करण्यासाठी आलेल्या अर्जावरील / प्रस्तावावर चौकशी समितीच्या अहवालाचा विचार करणे. | म : ७४/२६०४२५<br>अंजूमन खैरूल इस्लामचे पूना कॉलेज, १६४७, कॅम्प, न्यु मोदिखाना, पुणे - ४११००१ (युनिपुणे आयडी.: **CAAP010210**) या संस्थेस/महाविद्यालयास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून मानवविज्ञान विद्याशाखा - एम. फिल. अर्थशास्त्र तसेच विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा - एम.फिल. केमिस्ट्री हे अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने बंद (**Progressive Closure**) करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| १७ प्रव-अ-७०/२६०४२५<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून राजगड ज्ञानपीठाचे सौ. निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भोर, ता. भोर, जि. पुणे - ४१२२०६ (युनिपुणे आयडी. : CEDP014170) या संशोधन केंद्रातील आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा - एम. फिल. (एज्युकेशन) (रेग्युलर) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून टप्प्याटप्प्याने बंद (Progressive Closure) करण्यासाठी आलेल्या अर्जावरील / प्रस्तावावर चौकशी समितीच्या अहवालाचा विचार करणे. | म : ७५/२६०४२५<br>राजगड ज्ञानपीठाचे सौ. निर्मलाताई थोपटे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, भोर, ता. भोर, जि. पुणे - ४१२२०६ (युनिपुणे आयडी. : **CEDP014170**) या संस्थेस/महाविद्यालयास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२१ मधील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा - एम. फिल. (एज्युकेशन) (रेग्युलर) हा अभ्यासक्रम टप्प्याटप्प्याने बंद (**Progressive Closure**) करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| १८ प्रव-अ-७१/२६०४२५<br>मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील अवमान याचिका क्र. २१/२०२० व याचिका क्र. ३१९६/२०२२ श्रीमती शुभांगी गोडसे विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर अन्वये मा. उच्च न्यायालयाने प्रस्तुत अवमान याचिकेमध्ये दि. २१/०२/२०२४ रोजीच्या आदेशानुसार श्री शिवाजी मराठा सोसायटी, पुणे संचलित अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर, पुणे - ४११ ००९ या महाविद्यालयावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांच्यावर लादावयाची शास्ती) एकरुप परिनियम, २०१८ मधील तरतूदीनुसार व्यवस्थापन परिषदेने ठरविलेले शास्तीचे प्रमाण लादणेकामी नोटीस देणेबाबत. | म : ७६/२६०४२५<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांच्यावर लादावयाची शास्ती) एकरुप परिनियम, २०१८ मधील मुद्दा क्र. ४(६) नुसार कसूरदार श्री शिवाजी मराठा सोसायटी, पुणे संचालित अध्यापक महाविद्यालय, अरण्येश्वर, पुणे- ४११ ००९ या महाविद्यालयास म : २८५/२६१०२४ नुसार ठरविण्यात आल्याप्रमाणे शास्ती का लादण्यात येऊ नये याची अंतिम कारणे दाखवा नोटीस प्रस्तुत विभागाचे पत्र संदर्भ क्र. सीए/२२२४, दिनांक ११/१०/२०२४ अन्वये देण्यात आली होती. कसूरदार महाविद्यालय/संस्थेद्वारा पत्र जावक क्र. ५६३/२०२४-२०२५, दिनांक २८ नोव्हेंबर, २०२४ रोजीचा लेखी खुलासा प्राप्त झालेला आहे. या लेखी स्पष्टीकरणात संस्थेच्या व महाविद्यालयाच्या आर्थिक परिस्थितीमध्ये मागील फरकाची रक्कम देणे अशक्य आहे, असे नमूद केले आहे. संस्थेमध्ये विनाअनुदानित विभागात कोणालाही ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन दिले जात नाही कारण ती क्षमता नाही. त्यास काही कालावधी जाण्याची शक्यता आहे. फरकाची तरतुद मात्र होऊ शकणार नाही असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. त्यापुढे अन्यथा नाईलाजास्तव संस्थेला विनाअनुदानित तुकडी कायम स्वरुपी बंद करण्याची प्रक्रिया सुरू करावी लागेल, असेही गर्भित सूचक केले आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांच्यावर लादावयाची शास्ती) एकरुप परिनियम, २०१८ मधील मुद्दा क्र. ४(६) नुसार कसूरदार महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थेच्या व्यवस्थापनाकडून अंतिम कारणे दाखवा नोटीसीचे लेखी स्पष्टीकरण आणि नोटीस संबंधित संस्थेकडून कसूरदार महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने |

| | |
|---|---|
| | दर्शविलेल्या कारणांचा विचार करण्यासाठी आणि लादण्यात येणाया शास्तीचे प्रमाण ठरविण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (कसूरदार संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था यांच्यावर लादावयाची शास्ती) एकरुप परिनियम, २०१८ मधील मुद्दा क्र. ४(७) नुसार कारवाई करण्याकरिता मान्यता देण्यात येत आहे. |
| १९ प्रव-अ-७२/२६०४२५<br>राजगड ज्ञानपीठ, श्री.छत्रपती शिवाजीराजे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सर्व्हे नं. २३७, धांगवाडी, ता.भोर, जि.पुणे महाराष्ट्र ४१२ २०६ या महाविद्यालयाच्या नावात बदल करणेबाबत. | म : ७७/२६०४२५<br>राजगड ज्ञानपीठ, श्री. छत्रपती शिवाजीराजे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सर्व्हे नं. २३७, धांगवाडी, ता. भोर, जि. पुणे महाराष्ट्र ४१२ २०६ या महाविद्यालयाच्या नावात खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून पुढीलप्रमाणे बदल करण्यास 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>"राजगड टेक्नीकल कॅम्पस, सर्व्हे नं. २३७, धांगवाडी, ता.भोर, जि.पुणे महाराष्ट्र ४१२ २०६."<br>**Rajgad Technical Campus, Sr. No. 237, Dhangwadi, Tal-Bhor, Dist-Pune, Maharashtra, 412 206.**<br>अटी व शर्ती :<br>१. उपरोक्त महाविद्यालयाच्या नावातील बदल हा फक्त त्या बाबी पुरताच मर्यादित असून अशा बदलामुळे त्या महाविद्यालयास यापूर्वी प्राप्त मूळ शासन मान्यतेत बदल होणार नाही.<br>२. अशा नाव बदलामुळे शासनावर कोणतेही अतिरिक्त दायित्व निर्माण होणार नाही. |
| २० प्रव-अ-७३/२६०४२५<br>प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी (मुलींचे), बोऱ्हाडेवाडी, मोशी, ता. हवेली, जि. पुणे या महाविद्यालयाच्या नावात बदल करणेबाबत. | म : ७८/२६०४२५<br>प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी (मुलींचे), बोऱ्हाडेवाडी, मोशी, ता. हवेली, जि. पुणे महाराष्ट्र ४१२ १०५ या महाविद्यालयाच्या नावात खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून पुढीलप्रमाणे बदल करण्यास 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>"प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, मोशी, ता. हवेली, जि. पुणे ४१२ १०५."<br>**"Progressive Education Society's Modern College of Pharmacy, Moshi, Tal-Haveli, Dist-Pune 412105."**<br>अटी व शर्ती :<br>१. उपरोक्त महाविद्यालयाच्या नावातील बदल हा फक्त त्या बाबी पुरताच मर्यादित असून अशा बदलामुळे त्या महाविद्यालयास यापूर्वी प्राप्त मूळ शासन मान्यतेत बदल होणार नाही.<br>२. अशा नाव बदलामुळे शासनावर कोणतेही अतिरिक्त दायित्व निर्माण होणार नाही. |
| २१ प्रव-अ-७४/२६०४२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या Information Techonology (Usage, Governance and Protection) Policy, 2024 (Version 1.0) चा मसुदा मान्यतेसाठी पुनःश्च फेरसादर. | म : ७९/२६०४२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ **Information Techonology (Usage, Governance and Protection) Policy, 2024 (Version 1.0)** च्या मसुद्यास मान्यता देण्यात येत आहे. |

<table>
<tr><td>२२ प्रव-अ-७५/२६०४२५<br>श्रीमती निला सोमनाथ बिडलान यांना स्वच्छक या पदावर सामावून घेण्याबाबत.</td><td>म : ८०/२६०४२५<br>श्रीमती निला सोमनाथ बिडलान यांना स्त्री कामगार या पदाऐवजी स्वच्छक या पदावर सामावून घेण्याबाबतचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.</td></tr>
<tr><td>२३ प्रव-अ-७६/२६०४२५<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून विविध अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने बंद (Progressive Closure) करण्यासाठी आलेल्या अर्जावरील/प्रस्तावावर चौकशी समितीच्या अहवालाचा विचार करणे.</td><td>म : ८१/२६०४२५<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून खालील तक्त्यांमधील महाविद्यालयांतील अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने बंद (Progressive Closure) करणेसंदर्भात वित्त विभाग, परीक्षा विभाग, अंतर्गत गुणवत्ता व सिध्दता कक्ष, विद्यार्थी विकास मंडळ व नियोजन व विकास विभाग यांचेकडून काही हरकत आहे किंवा कसे तसेच संबंधित महाविद्यालयाचे/मान्यताप्राप्त परिसंस्थेचे/अभ्यासक्रमांचे विद्यार्थी/परीक्षार्थी बाकी आहेत किंवा कसे त्याचप्रमाणे सदरहू महाविद्यालयाकडून/संस्थेकडून काही येणे आहे किंवा कसे, याबाबतची माहिती मिळविण्याच्या अधिन राहून 'ना-हरकत प्रमाणपत्र' देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
<table>
<tr><th>अ क्र</th><th>महाविद्यालयाचे नाव</th><th>शैक्षणिक वर्ष</th><th>संलग्नीकरणाचा प्रकार</th><th>बंद करावयाचे अभ्यासक्रम</th></tr>
<tr><td rowspan="5">१</td><td rowspan="5">माईर्स एम.आय.टी. आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, आळंदी, देहु फाटा, आळंदी-देवाची, ता.हवेली, जि. पुणे ४१२१०५</td><td rowspan="5">२०२४-२०२५</td><td>अभ्यासक्रम बंद</td><td>मानव विज्ञान विद्याशाखा<br>१) एम.ए. (मास कम्युनिकेशन अ‍ॅड जर्नलीजम) एम.जे.एम.सी.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम बंद</td><td>२) बी.ए.</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम बंद</td><td>३) सर्टीफिकेट कोर्स इन जर्मन</td></tr>
<tr><td>अभ्यासक्रम बंद</td><td>वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा<br>१) एम.कॉम.</td></tr>
<tr><td>(१ तुकडी बंद) (विद्यार्थी प्रवेश क्षमता - १२०)</td><td>१) बी. कॉम.</td></tr>
<tr><td>२</td><td>एच.व्ही.देसाई कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स अ‍ॅण्ड कॉमर्स, बुधवार पेठ, पुणे ०२</td><td>२०२४-२०२५</td><td>(१ तुकडी बंद) (विद्यार्थी प्रवेश क्षमता - १२०)</td><td>विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा<br>१) बी. एस्सी.</td></tr>
<tr><td>३</td><td>श्री चाणक्य एज्युकेशन सोसायटी, इंदिरा कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स, 'ध्रुव', ८९/२-ए, नवीन पुणे - मुंबई हायवे, ताथवडे, पुणे ४११०३३</td><td></td><td>(१ तुकडी बंद) (विद्यार्थी प्रवेश क्षमता - १२०)</td><td>वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा<br>१) बी.कॉम.</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>२४ प्रव-अ-७७/२६०४२५<br>विद्यापीठ परिपत्रक क्र.३१६/२०२४, जा.क्र.एएन/५४१६, दि. ३०/१२/२०२४ बाबत प्राप्त झालेली पत्रे/निवेदने/ईमेल इत्यादी.</td><td>म : ८२/२६०४२५<br>सदरचा प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात यावा.</td></tr>
<tr><td>२५ प्रव-अ-७८/२६०४२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी श्री साईबाबा संस्थान यांच्यामार्फत भोजन उपलब्ध करुन घेण्याबाबत.</td><td>म : ८३/२६०४२५<br>श्री साईबाबा संस्थानामार्फत दर्शनासाठी येणाया भाविकांना अत्यल्प दरामध्ये उत्तम दर्जाचे भोजन पुरविण्यात येते. सदर बाब विचारात घेता विद्यापीठामधील विद्यार्थ्यांना अश्याच स्वरूपाचे अत्यल्प दरातील प्रसादमय भोजन पुरविण्यासाठी श्री साईबाबा संस्थानास तसा प्रस्ताव सादर</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| २६ प्रव-अ-७९/२६०४२५<br>विद्यापीठ निधीतून नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक व शिक्षक समकक्ष आणि शिक्षकेतर कर्मचायांना यापुढे बाल संगोपन रजा देणेबाबत. | म : ८४/२६०४२५<br>दिनांक ३०/११/२०२४ व ०१/१२/२०२४ रोजी झालेल्या अधिसभेच्या सभेमध्ये प्रस्ताव क्र. अप्र (५४)/३०११२४ नुसार विद्यापीठ निधीतुन नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षक व शिक्षक समकक्ष आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना बालसंगोपन रजा देण्यास मान्यता देण्यात येत आहे.<br>सदरील रजेसाठी मानक कार्यप्रणाली (**Standard of Operating**) करण्यात यावी. |
| २७ प्रव-अ-८०/२६०४२५<br>नाशिक उपकेंद्राच्या पालिका बाजार इमारत येथील नाशिक महानगरपालिकेच्या भाडेतत्त्वावर घेतलेल्या गाळ्यांचे दिनांक ०१.०४.२०२४ ते दिनांक ३१.०३.२०२५ या कालावधीचे जागा भाडे मागील थकबाकीसह अदा करणेबाबत. | म : ८५/२६०४२५<br>नाशिक महानगरपालिकेकडून विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्रासाठी पालिका बाजार इमारत, शरणपूर रोड, नाशिक येथील लायसेन्स फी तत्त्वावर घेण्यात आलेल्या १८ गाळ्यांचे आर्थिक वर्षे २०२३-२४ व २०२४-२५ या कालावधीचे जागा भाडे अदा करणेसाठी प्राप्त झालेल्या देयकांची चालू मागणी रक्कम रु.१८,१९,६९७/- अधिक मागील आर्थिक वर्षाची थकबाकी रु.१६,३९,४०४/- असे एकूण रु.३४,५९,१०१/- (अक्षरी रुपये चौतीस लक्ष एकोणसाठ हजार एकशे एक मात्र) ही रक्कम अदा करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. |
| २८ प्रव-अ-८१/२६०४२५<br>आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारितील विद्यार्थ्यांकरीता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आवारामध्ये वसतिगृहासाठी जागा उपलब्ध करून देणेबाबत. | म : ८६/२६०४२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध विभागांमध्ये प्रवेशित विद्यार्थी/विद्यार्थीनी यांच्यामध्ये जातीय सलोखा व सर्व धर्म समभावाची भावना वृद्धिंगत व्हावी. तसेच, विद्यापीठामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांव्यतिरिक्त अन्य विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये प्रवेश दिल्यास प्रशासकीय पेच प्रसंगांनाही सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. या बाबी विचारात घेता, विद्यापीठातील विद्यार्थ्यांना वसतिगृहाची चांगली सुविधा प्रदान करण्याच्या दृष्टीकोनातून फक्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी वसतिगृह उभारण्याकरीता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारामध्ये जागा उपलब्ध करून देण्याच्या अटीवर आदिवासी विकास विभाग व सामाजिक न्याय विभागाच्या वसतिगृह उभारण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.<br>वसतिगृह उभारण्यासंदर्भात विद्यापीठाचा, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विभाग यांच्या सहसमवेत करावयाच्या सामंजस्य कराराचा मसुदा मा. व्यवस्थापन परिषदेच्या निदर्शनास आणून तद्नंतरच अंतिम स्वरुन देण्यात यावे. |
| २९ प्रव-अ-८२/२६०४२५<br>मा.प्राचार्य डॉ.नितीन लक्ष्मण घोरपडे, मा.व्यवस्थापन परिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली घटीत केलेल्या समितीच्या दि.२९/०३/२०२५ रोजीच्या अहवालाबाबत. | म : ८७/२६०४२५<br>सदरील प्रस्ताव मा. व्यवस्थापन परिषदेच्या आगामी सभेत पुनःश्च सादर करण्यात यावा. |
| ३० प्रव-अ-८३/२६०४२५<br>मा. अधिसभेच्या दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ व दि.०१ डिसेंबर, २०२४ रोजी झालेल्या सभेतील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्रशासनातील विधिव्दारे स्थापित पदे नियमित भरावीत व एक व्यक्ती एक पद या नियमावलीचे | म : ८८/२६०४२५<br>प्रस्तावात नमूद बाबीवर प्रशासकीय सुधारणा समितीचे कामकाज सुरू असल्याने सदर प्रस्तावाची नोंद घेण्यात येत आहे. |

<table>
<tr>
<td>काटेकोरपणे पालन करावे संदर्भातील शिफारस मा.व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.</td>
<td></td>
</tr>
<tr>
<td>३१ प्रव-अ-८४/२६०४२५<br>शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी नवीन महाविद्यालयांच्या अंतिम मान्यतेच्या शिफारसींबाबत.</td>
<td>म : ८९/२६०४२५<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १०९ मधील तरतूदींनुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एनजीसी २०१७/(२९/१७)/मशि-४, दिनांक १५ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दती आणि निकषांनुसार तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक एचटिईडी-२९०६६(११)/१/२०२४/७३०८९०-एमएचटी-(एचई-४), दिनांक १५ फेब्रुवारी, २०२४ अन्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी इरादापत्र मंजूर करण्यात आलेल्या पदवी अभ्यासक्रमांच्या संबंधित नवीन महाविद्यालयांना शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता शासनाच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करणेकामी संबंधित याचिकांच्या/न्यायप्रविष्ट बाबींच्या अधीन राहून प्रस्तावा सोबत जोडलेल्या विवरणात नमूद करण्यात आलेल्या संबंधित संस्था/महाविद्यालयनिहाय नियुक्त तज्ज्ञ समितीच्या शिफारसी मा. अधिष्ठाता मंडळाच्या शिफारशींसह अंतिम मान्यतेसाठी शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.</td>
</tr>
<tr>
<td>३२ प्रव-अ-८५/२६०४२५<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांडेवाडी, भोसरी, पुणे - ४११०३९ या महाविद्यालयातील खाली नमूद केलेले अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने बंद (Progressive Closure) करण्याच्या मान्यतेबाबत.
<table>
<tr><th>प्रस्ताव प्रकार</th><th>विद्याशाखा</th><th>अभ्यासक्रम</th><th>विद्यार्थी संख्या</th></tr>
<tr><td>अभ्यासक्रम बंद</td><td>मानवविज्ञान</td><td>एम.ए. इतिहास</td><td>६०</td></tr>
<tr><td></td><td>मानवविज्ञान</td><td>एम.ए. इंग्रजी</td><td>६०</td></tr>
<tr><td></td><td>मानवविज्ञान</td><td>एम.ए. अर्थशास्त्र</td><td>६०</td></tr>
<tr><td></td><td>मानवविज्ञान</td><td>मास्टर ऑफ जर्नलीजम अँड मास कम्युनिकेशन (एम.जे.एम.सी.)</td><td>६०</td></tr>
<tr><td></td><td>मानवविज्ञान</td><td>बॅचलर लायब्ररी अँड इन्फॉमेशन सायन्स (बी.लिब. अँड आय. एस्सी)</td><td>६०</td></tr>
<tr><td>तुकडी बंद</td><td>मानवविज्ञान</td><td>बी.ए.</td><td>१२०</td></tr>
<tr><td></td><td>वाणिज्य व व्यवस्थापन</td><td>बी.कॉम.</td><td>१२०</td></tr>
<tr><td></td><td>वाणिज्य व व्यवस्थापन</td><td>एम.कॉम.</td><td>६०</td></tr>
</table>
</td>
<td>म : ९०/२६०४२५<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १२१ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लांडेवाडी, भोसरी, पुणे - ४११०३९ या महाविद्यालयातील खालील नमूद केलेले अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने बंद (Progressive Closure) करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत शासनास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
<table>
<tr><th>प्रस्ताव प्रकार</th><th>विद्याशाखा</th><th>अभ्यासक्रम</th><th>विद्यार्थी संख्या</th></tr>
<tr><td>अभ्यासक्रम बंद</td><td>मानवविज्ञान</td><td>एम.ए. इतिहास</td><td>६०</td></tr>
<tr><td></td><td>मानवविज्ञान</td><td>एम.ए. इंग्रजी</td><td>६०</td></tr>
<tr><td></td><td>मानवविज्ञान</td><td>एम.ए. अर्थशास्त्र</td><td>६०</td></tr>
<tr><td></td><td>मानवविज्ञान</td><td>मास्टर ऑफ जर्नलीजम अँड मास कम्युनिकेशन (एम.जे.एम.सी.)</td><td>६०</td></tr>
<tr><td></td><td>मानवविज्ञान</td><td>बॅचलर लायब्ररी अँड इन्फॉमेशन सायन्स (बी.लिब. अँड आय. एस्सी)</td><td>६०</td></tr>
<tr><td>तुकडी बंद</td><td>मानवविज्ञान</td><td>बी.ए.</td><td>१२०</td></tr>
<tr><td></td><td>वाणिज्य व व्यवस्थापन</td><td>बी.कॉम.</td><td>१२०</td></tr>
<tr><td></td><td>वाणिज्य व व्यवस्थापन</td><td>एम.कॉम.</td><td>६०</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>३३ प्रव-अ-८६/२६०४२५<br>शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून डॉ. डी. वाय. पाटील यूनिटेक सोसायटीचे डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, पिंपरी, पुणे ४११०१८ महाविद्यालयांतील विविध अभ्यासक्रम / तुकडी टप्प्या-टप्प्याने बंद (Progressive Closure) करण्यासाठी आलेल्या अर्जावरील/प्रस्तावावर चौकशी समितीच्या अहवालाचा विचार करणेबाबत.</td>
<td>म : ९१/२६०४२५<br>शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून डॉ. डी. वाय. पाटील यूनिटेक सोसायटीचे डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड रिसर्च, पिंपरी, पुणे ४११०१८ महाविद्यालयातील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेतील खालील अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने बंद (Progressive Closure) करणेसंदर्भात वित्त विभाग, परीक्षा विभाग, अंतर्गत गुणवत्ता व सिध्दता कक्ष, विद्यार्थी विकास मंडळ व नियोजन व विकास विभाग यांचेकडून काही हरकत आहे किंवा कसे तसेच संबंधित महाविद्यालयाचे / मान्यताप्राप्त परिसंस्थेचे / अभ्यासक्रमांचे विद्यार्थी /परीक्षार्थी बाकी आहेत</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td>किंवा कसे त्याचप्रमाणे सदरहू महाविद्यालयाकडून / संस्थेकडून काही येणे आहे किंवा कसे, याबाबतची माहिती मिळविण्याच्या अधिन राहून 'ना-हरकत प्रमाणपत्र' देण्यास मान्यता देण्यात येत आहे.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>अभ्यासक्रम</th><th>विद्यार्थी प्रवेश क्षमता</th><th>संलग्नीकरणाचा प्रकार</th></tr>
<tr><td>१</td><td>एम.बी.ए.</td><td>१८०</td><td>अभ्यासक्रम बंद</td></tr>
<tr><td>२</td><td>एम.सी.ए.</td><td>१२०</td><td>अभ्यासक्रम बंद</td></tr>
<tr><td>३</td><td>एम.बी.ए. (डिजीटल मार्केटिंग)</td><td>६०</td><td>अभ्यासक्रम बंद</td></tr>
<tr><td>४</td><td>पी.जी.डी.ई.एम.</td><td>३०</td><td>अभ्यासक्रम बंद</td></tr>
<tr><td>५</td><td>पी.जी.डी.एच.एम.</td><td>३०</td><td>अभ्यासक्रम बंद</td></tr>
<tr><td>६</td><td>पी.जी.डी.सी.एम.</td><td>६०</td><td>अभ्यासक्रम बंद</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>३४ प्रव-अ-८७/२६०४२५<br>डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीचे डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, ताथवडे, पुणे ४११०३३ या महाविद्यालयांस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथून डॉ. डी. वाय. पाटील ज्ञान प्रसाद विद्यापीठ, पुणे या विद्यापीठाशी संलग्नित करण्यास 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्याबाबत.</td>
<td>म : ९२/२६०४२५<br>डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीचे डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, ताथवडे, पुणे ४११०३३ या महाविद्यालयांस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथून डॉ. डी. वाय. पाटील ज्ञान प्रसाद विद्यापीठ, पुणे या विद्यापीठाशी संलग्नित करण्यास 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यास परवानगी देण्यात येत आहे.</td>
</tr>
<tr>
<td>३५ प्रव-अ-८८/२६०४२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व विद्यापीठाची उपकेंद्रे येथे बाह्य यंत्रणेमार्फत सुरक्षा कर्मचारी/अधिकारी नेमण्यासाठी एजन्सीची विहीत प्रक्रियेने निवड करण्याकरीता ई-निविदा प्रक्रिया राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक ई-निविदा दस्ताऐवजाचा मसुदा, वर्तमानपत्रामध्ये द्यावयाच्या जाहिरातीचा मसुदा तसेच या विषयाशी अनुषंगिक कार्यवाहीची धोरणात्मक रुपरेषा ठरविण्यासाठी मा. डॉ. पराग काळकर, प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखालील घटीत समितीचा दिनांक ०८ एप्रिल, २०२५ रोजीचा अहवाल विचारार्थ व निर्णयार्थ सादर.</td>
<td>म : ९३/२६०४२५<br>मा. डॉ. पराग काळकर, प्र-कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली घटीत समितीने दिनांक ०८ एप्रिल, २०२५ रोजी सादर केलेल्या अहवालावर चर्चा करण्यात आली व खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलाः<br>सुरक्षा कर्मचारी/अधिकारी नियुक्त करण्यासाठी इच्छुक आस्थापनांकडून Letter of Intent/Letter of Expression/E-Tender मागविण्यास व नियमानुसार विहीत प्रक्रीया राबविण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.<br>विद्यापीठासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांच्या सुरक्षा सेवेच्या करारास पुढील ३ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास व यासाठी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.</td>
</tr>
<tr>
<td>३६ प्रव-अ-८९/२६०४२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सन १९९९ ते २०२४ या काळातील इतिहास लेखनाच्या कामासाठी प्रकल्प समन्वयक आणि संशोधन सहायक या मानधन तत्वावरील पदांना मुदतवाढ देणेबाबत.</td>
<td>म : ९४/२६०४२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सन १९९९ ते २०२४ या काळातील इतिहास लेखनाच्या कामासाठी मा. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २७ जुलै, २०२४ रोजी झालेल्या सभेमधील ठराव क्र. म:२३४/२७०७२४ नुसार नेमण्यात आलेल्या प्रकल्प समन्वय आणि संशोधन सहायक यांना ३ महिने मुदतवाढ देण्यास व त्यापोटी येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चास तसेच सदर खर्च अमृत महोत्सव या अर्थशिर्षातुन करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.</td>
</tr>
<tr>
<td>०१ प्रव-क-०६/२६०४२५<br>शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी अस्तित्वात असलेल्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये नवीन पाठ्यक्रम/अभ्यासक्रम, नवीन विषय, विशेषस्तर विषय, नैसर्गिक वाढ, नवीन अतिरिक्त तुकडी, प्रवेश क्षमता वाढ, नवीन विद्याशाखा इ. सुरु करण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जांच्या व तज्ज्ञ समिती अहवालांच्या अंतिम</td>
<td>म : ९५/२६०४२५<br>शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी अस्तित्वात असलेल्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये नवीन पाठ्यक्रम/अभ्यासक्रम, नवीन विषय, विशेषस्तर विषय, नैसर्गिक वाढ, नवीन अतिरिक्त तुकडी, प्रवेश क्षमता वाढ, नवीन विद्याशाखा इ. सुरु करण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जांच्या व तज्ज्ञ समिती अहवालांच्या अंतिम</td>
</tr>
</table>

| | |
|---|---|
| मान्यतेच्या शिफारसींबाबत. | मान्यतेसह शासनास शिफारस करण्यास विशेषबाब म्हणून मा. कुलगुरु यांनी मा. व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मान्यता दिलेली असुन सदर कार्यवाहीची मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे. |
| ०२ प्रव-क-०७/२६०४२५<br>विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत चार नवीन योजना राबविण्यासाठी मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत. | म : ९६/२६०४२५<br>गुणवत्ता सुधार योजना समितीच्या दिनांक २८ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या सभेने मंजुरी दिलेल्या चार नवीन योजना राबविण्यासाठी मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या प्रशासकीय व वित्तीय मान्यतेच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. |
| ०३ प्रव-क-०८/२६०४२५<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील प्रकरण १२ कलम १३४ (७) अन्वये केलेल्या गुंतवणूकीबाबत. | म : ९७/२६०४२५<br>दि. ३१/०३/२०२५ अखेर विद्यापीठाच्या देणगी खात्यामधून प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे केलेल्या गुंतवणूकीस मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिलेल्या मान्यतेच्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. |
| ०४ प्रव-क-०९/२६०४२५<br>मार्च/एप्रिल २०२५ परीक्षेसाठी उत्तरपत्रिका खरेदीबाबत. | म : ९८/२६०४२५<br>मार्च/एप्रिल २०२५ परीक्षेसाठी उत्तरपत्रिका खरेदीबाबत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन परिषदेच्यावतीने दिलेल्या मान्यतेच्या कार्यवाहीची कार्योत्तर मान्यतेसह नोंद घेण्यात येत आहे. |

(प्रा (डॉ.) ज्योती भाकरे)
मा. प्रभारी कुलसचिव
सचिव

(प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी)
मा. कुलगुरु
अध्यक्ष